

१९६९
म. ग्रं. सं. ठाणें
य काव्य
क्र. १९७४
REFBK-0017546
REFBK-0017546

# स्वप्नरेषा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १०५४६

द. का. कुलकर्णी

REFBK-0017546
REFBK-0017546

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना
१९७०

'नेत्रदीप' प्रकाशन : १
पहिली आवृत्ती : जानेवारी १९६९
© द. का. कुलकर्णी

□

वेष्टनावरील चित्र

**एम्. आर. फणसेकर**

□

किंमत : **चार रुपये**

□

मुद्रक :

**चिंतामण वामन जोशी**

माधव प्रिंटिंग प्रेस

अलिबाग–कुलाबा.

□

प्रकाशक :

**द. का. कुलकर्णी**

सत्यनिवास, ५१ ए गोखले रोड (नॉर्थ)

दादर, मुंबई २८.

ती. अण्णा व माई
यांच्या पवित्र स्मृतीस
सप्रेम अर्पण.

# स्वप्नान्तरांत....

स्वप्नरेषा. कांहीं वैयक्तिक अनुभवाच्या, कांहीं परिचितांच्या जीवनांतल्या तर कांहीं संपूर्णतया काल्पनिक. बहुतेक मुक्तछंदांत विशिष्ट क्षणीं येणारे मनस्वी अनुभव टिपणाऱ्या, क्षणचित्राच्या स्वभावाच्या. नवीन पद्धतीनें आकारलेल्या. दुर्बोधता टाळणाऱ्या. प्रीतीचें सफल किंवा असफल स्वप्न चितारणाऱ्या. कांहीं बंडखोर, तर कांहीं अगतिक, पण जीवनानुभावाशीं एकनिष्ठ राहून हेलावणाऱ्या आर्त भावना स्पष्ट शब्दांत व्यक्त करणाऱ्या. त्यांचें वाङ्मयीन स्थान रसिक वाचकांनीं व चोखंदळ टीकाकारांनीं ठरवायचं आहे. कांहीं यापूर्वींच ' अभिरुचि ', ' यशवंत ', ' अर्चना ' वगैरे सुविख्यात मासिकांत प्रसिद्ध झाल्या आहेत. मी आशा करतो माझ्या पहिल्याच प्रयत्नाचें वाचक व टीकाकार स्वागत करतील. तेही एक स्वप्नच !

मन घेत नव्हतं प्रसिद्ध करण्यास. पण कांहीं जीवाभावाच्या व्यक्तींचा आग्रह मोडता येईना. त्यांचा नामनिर्देश करणं त्यांनाच आवडणार नाहीं म्हणून तें टाळतो. स्वतः अंधारांत राहून या स्वप्नरेषांकडे प्रेमानें त्यांनीं पाहिलं अन् मला हायसं वाटलं. श्री. श्रीकांत सिनकर व कवि प्रफुल्लदत्त यांनीं प्रोत्साहन दिलें नसतें तर ' स्वप्नरेषा ' प्रसिद्ध झालें नसतें. सौ. शिरीष पै यांनीं ' स्वप्नरेषे 'चें सूक्ष्म वाचन करून त्याची ' रूपरेखा ' आनंदानें लिहून दिली याबद्दल त्यांचा आभारी आहे. ' माधव प्रिंटिंग प्रेस, अलिबाग 'चे चालक श्री. जोशी यांनी पुस्तक छपाईचें काम अत्यंत काळजीपूर्वक व सुंदर केल्याबद्दल त्यांचे आभार मानायला हवेत. तसेच मुखपृष्ठावरील चित्र श्री. एम्. आर. फणसेकर यांनीं काढून दिल्याबद्दल व मुखपृष्ठाच्या छपाईचे काम ' चित्रभारती 'ने त्वरित करून दिल्याबद्दल त्यांचा आभारी आहे.

—द. का. कुलकर्णी

## ' स्वप्नरेषे 'ची रूपरेखा....

कांही थोड्या कवितांचे अपवाद सोडल्यास श्री. द. का. कुलकर्णी ह्यांच्या ' स्वप्नरेषें 'तील कविता बहुधा मुक्त कविताच आहे. ती नुसतीच मुक्त कविता नाही तर एका विशिष्ट आशयानेच ती अथपासून इतिपर्यंत भरलेली आहे. ह्या सर्व कवितेंतून चिर-विमुक्ताचा एक आर्त उद्गार दुमदुमत आहे. या चिरविरहावस्थेंत तल्लीन राहाणें हें श्री. कुलकर्णी यांच्या कविमनाचें पहिलें निदर्शक चिन्ह म्हटलें पाहिजे. कविमन रूक्ष दैनंदिन व्यवहारांत रमत नाहीं. हें व्यवहारी जग ओलांडून तें एका स्वप्नसृष्टींतच सदैव तरळत असते. ही स्वप्नसृष्टी निराकार व धूसर असली तरी कविला मात्र ती प्रत्यक्ष सत्याहून अधिक सत्य भासत असते. प्रीतीच्या दिव्य किरणांनी तेजाळलेल्या ह्या स्वप्नसृष्टीबाहेर त्यांचे मन बहुधा यावयास तयार नसते; पण नियतीच्या क्रूर छाया अखेर त्या स्वप्न-सृष्टीला झांकून टाकतात आणि आपल्या स्वप्नसृष्टींतून व्यवहारी जगांत कोसळलेला हताश कवि फक्त दिव्य स्मृतींच्या आभासावर भरवंसा ठेवून नशिबाला आलेला व्यवहाराचा खडतर मार्ग आक्र-मत असतो. आपले प्रेम प्रत्यक्ष मिळण्यापेक्षां त्याच्या ओढींत कविला अधिक गोडी असते. सामान्य सुखांत रमून जाण्यापेक्षां हरपलेल्या श्रेयाचा जाळून काढणारा विरह कवीला अधिक श्रेय-स्कर वाटतो.

' स्वप्नरेषें 'तून प्रत्ययाला येणारे कविमनाचे चित्र वरील प्रमाणें आहे. ह्या मुक्त कवितांतून आपल्या उन्मुक्त मनाचे उद्रेक कवीनें उत्कटपणें उधळून दिले आहेत. शब्दासाठी कुठेही अडून न बसतां त्या त्या क्षणांची चित्रें जशी पकडता येतील तशी त्यानें पकडली आहेत. किंबहुना असेंच म्हणावें लागेल कीं त्यांच्या ह्या कविता खरोखरी कविता नसून तीं कविमनाचे असंख्य ' मूडस् ' पकडणारी त्या त्या क्षणांची काहीशी अस्पष्ट परंतु अत्यंत भावार्त अशी क्षण-चित्रेंच आहेत. ती वरकरणी गद्य, साधीं अन् सरळ असली तरी

त्या विशिष्ट क्षणांची व्याकुळता त्या चित्रांतून अचूक उतरली आहे. त्या आर्त क्षणांचे काहीसे गढूळ रंग त्या चित्रांतून सर्वत्र पसरलेले आहेत. उदाहरणार्थ 'मौन' ही कविता पाहाः–

तुझ्या माझ्या मौनात आपलं जीवन हरवलं आहे
तूं तिकडे. मी इकडे. मध्यें जीवनाची वक्रगति
पाठलाग करणारी. चकवणारी. उफराट्या तोंडाची.
आपल्या दिवाणखान्यांतील दोन पुतळ्यांसारखे आपण
समोरासमोर पण स्तब्ध. अबोल. भावनाशून्य.
पण–
डोहाच्या पाण्यावर तरंग उमटत असले तरी
त्या अंतरीची खळबळ बोलकी असते
दबलेले उद्रेक अचानक उफाळून येतात
अन् त्याच्या लाटांना कांठही अपुरे पडतात.

ही वरील एक कवितासुद्धा 'स्वप्नरेषे' मधील समग्र मुक्त भावकाव्याचा परिचय घडवून आणण्यासाठी पुरेशी आहे. आपल्याच वैयक्तिक अनुभूतींच्या ह्या विलक्षण विश्वांत मनुष्य अगदी एकटा एकटा होतो तेव्हाच त्याच्या असल्या–फक्त एकट्याच आणि एकट्यालाच जाणवतात, त्या संवेदना जाग्या होतात. तें मूक अन्तर्विश्व एकाएकी बोलके होते आणि मग तेव्हाच ही अशी मुक्त कविता आकाराला येते. केव्हातरी एकदाच ती अशी उफाळून येते, फिरून ते क्षण येत नाहीत.

श्री. कुलकर्णी ह्यांच्या 'स्वप्नरेषें'त हें असें एकदम उफाळून येणें घडलें आहे. त्यांची 'स्वप्नरेषा' फक्त एका विशिष्ट आर्ततेंतच डुंबत असली तरी तिच्यांतल्या गूढ गहिऱ्या संवेदना वाचकाच्या मनांतले संवेदनाविश्व कंपित करून जातात. खास हेंच तिचें यश. ती कदाचित एकसूरी असेल, कदाचित काहीशी अपूर्ण, अधूरी-अस्पष्टही असेल; पण या अपूर्णतेतच एक माधुर्य आहे. ही अपूर्णता मनाला कुठेतरी खोल चटका लावून जाते.

शिरीष पै

# अनुक्रम


१) स्वप्नाशा
२) आहुति
३) भूल
४) नवा अंकुर
५) भ्रांतिमान
६) मृगजळ
७) भग्नस्वप्न
८) आंस
९) कोणासाठी?
१०) तृप्ती
११) आवाहन
१२) परिपूर्ती
१३) जखम
१४) दिलासा
१५) संगम
१६) तूं अशीच ये!
१७) स्मृतितरंग
१८) सूड
१९) फसलेला डाव
२०) प्रतारणा
२१) मनीषा
२२) अबला
२३) विरलेले स्वप्न
२४) प्रतीक्षा-तृप्ती
२५) मीलन
२६) आसवांची माळ
२७) स्वप्नरेषा
२८) तलास
२९) वंचना
३०) उपेक्षा
३१) शहारा
३२) चक्र
३३) झेप
३४) कवडसा
३५) दैवाचा दुर्विलास
३६) मंगल अमंगल
३७) अगतिक
३८) इशारा
३९) खळें
४०) प्रतिमा

४१) असं कां झालं !
४२) आरे
४३) धसका
४४) नियती
४५) तुटलेले दुवे
४६) शोध
४७) कूटजाल
४८) एकच उत्तर, पण
किती उशीरा !
४९) जित्याची खोड
५०) अपराजित
५१) भरारी
५२) तूं आज भेटलीस तेव्हा
५३) माझे अश्रू
५४) मौन
५५) एकाकी
५६) नरक
५७) माती
५८) श्रावण सरी
५९) प्रश्नचिन्ह
६०) प्रीतिसंगम
६१) मी एकटाच म्हणून
६२) ठाऊक मला
६३) अनुभूति
६४) आवडतें नातें

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९८५४६

१ : स्वप्नाशा

तूं आलीस, पण मिटल्या ओठांनीच परतलीस.
कसे ओसरले तुझ्या शब्दांचे ते प्रवाह !
वाटलं होतं, तुझ्या उद्रेकांतून शब्दांचे प्रेमळ सर ओघळतील,
सुखाचे कांही क्षण मी वेचीन,
तुझ्या सुरांचे मधुर स्वर कानांत सांठवीन, अन्
नेत्रांतील पाखरांचे घुमारे माझ्या हृदयांत हेलावतील.
पण—
दिसला फक्त तुझ्या मनाचा संगमरवरी पुतळा, उभा
अबोल, निश्चल, मृतवत् !
गेलीस तेव्हां,
माझे डोळे पाणावले, एकलेपणाचा बांध फुटला
माझ्या उद्रेकाचा. मीच झालो माझा साक्षीदार
जीवनाच्या पिंजऱ्यांत, नियतीच्या न्यायालयांत,
तुझीच वाट पहात. मीलनाच्या स्वप्नाशेवर !

□ □

## २ : आहुति

निष्ठूर नियतीच्या वांकड्या वळणावर
दिसलीस तूं, एकच क्षण ! एकटी. मंगलसूत्र हेलावीत !
क्षणभर थबकलो मी. एका शब्दाच्या आशेनं.
पण व्रतस्थाच्या जिद्दीनं सरकलीस पुढें तूं,
माझी पावलं उपेक्षेच्या शृंखलांनीं जखडून !

आठवत आहेत मला आतां फक्त
तुझे विलोल नेत्र, अर्धस्फुट ओठ. तडफडणारे.
त्यांत फडफडणारी मुकी इवलीशी पांखरें,
शब्दाविना सर्वस्वाचं दान करणारी,
तुझं श्रेयस् जपणारी. माझं मला बजावणारी.
तेही—
प्रेयसाची आहुति देऊन !

□ □

## ३ : भूल

अथांग डोहाच्या कांठावर, सावल्यांच्या लपंडावांत
बसलो होतो एकटाच. तुझी प्रतीक्षा करीत.
तेंव्हां–
अवतीच्या चंदनलहरींनीं तुझी चाहूल दिली.
पाण्यावरील वर्तुळांनीं डोहाचा कांठही गांठला.
पारव्याच्या आर्तस्वरांतून तुझ्या प्रीतीचे स्वर उमटले.
वाटलं–
चंद्रकिरणांच्या कवडश्यांनीं तुझी मूर्ति टिपली.
पण, साराच भास !
भोळ्या आशांची भुलावण करणारा, जीवघेणा.
कारण, तूं आली नाहीस !

□ □

## ४ : नवा अंकुर

तुझ्या सुखी संसाराचे दोन अवशेष घेऊन तूं आलीस
दहा वर्षांनी. अनेक मैलांचं अंतर तुडवून !
आठवला तुझा गोड स्पर्श, वासनांना चेतविणारा.
मदालसेचे भावधुंद नेत्रद्वय. पौरुषाला आव्हान देणारे.
आसुसलेले ओठ, गालांवरील रक्तिमा, कपाळावरील स्वैर बटा,
टचटचित उरोजांचे दोन भाते. फुसफुसणारा नाग !
मीलनोत्सुक, थरथरणारे बाहू,
अन् दोनच शब्द. "या ना"

*　　*　　*

मी स्वतःला सावरलं. संयमानं
संसाराच्या प्रवाहांत ती स्मृति वाहून गेली.
चिमणा आपल्या चिमणीला अन् पिलांना सोडून गेला.
तुझ्या जीवनाची करुण कथा तुझ्या पांढऱ्या कपाळावर उमटली.
मी सांत्वनाचे दोनच शब्द बोललो. आधाराचं वचन दिलं.
तुझ्या निस्तेज नेत्रांत आशेची पांखरं चुळबुळली.
तुझे दोन बछडे—निष्पाप; निरागस जीव !
जुनी नातीं वाहून गेली. मानवतेची अंकुरली.
तूं एक दीर्घ निःश्वास टाकलास.
मी साथ दिली.
वासनाविरहित, पवित्र प्रेमानं—
त्या दोन बछड्यांसाठीं !

□ □

## ५ : भ्रान्तिमान

संध्येच्या शीतल किरणांची शाल पांघरून,
अथांग सागराच्या उत्तुंग लाटांच्या साक्षीनें
वचन दिलंस, ' मी तुझीच, '
पण खट्याळ लाटांनी बजावलं, ' सांभाळ हं '
माझ्या बाहूपाशांत लोटून तूं आव्हान स्वीकारलस.
पण–
विसरलीस ते वचन, दुसऱ्याची झालीस.

*　　　*　　　*

आज मी एकटाच या किनाऱ्यावर.
संध्या तशीच. लाटाही तशाच. उत्तुंग.
पण तूं जवळ नाहीस.
नियतीच्या न्यायालयांत अचूक साक्षीदार ठरल्या लाटा.
तेवढ्यांत मी चमकलो. दचकून पाहिलं तों,
मोतिया रंगाचं पातळ नेसलेली तूं शेजारी.
अन् म्हणालीस, ' जवळ आहे की तुझ्या. '
वाटलं, विश्रब्धपणे तूं माझ्या बाहुपाशांत विसावशील.
पण साराच भास!
अंधार दाटून आला. मी परतूं लागताच,
खट्याळ लाटा मिस्किलपणें हंसत होत्या.
खडकावर. विजयोन्मादानें!

□□

## ६ : मृगजळ

चंदेरी स्वप्नांची मोतिया शाल लपेटून,
कांटेरी बाभुळवन तुडवीत एकाकी पथिक,
श्रान्त–क्लान्त !
वेदनांच्या कोलाहलांत –अन्तरीं एक प्रचंड स्फोट,
दिक्कक्षा दुभंगून पुढे सरणारा.
बधीर कर्णरंध्रांनीं मागोवा घेतां,
अनंत अवकाशाच्या कराल पोकळींत
ध्वनिलहरींचा अवशेषही विरलेला.
वंचित–स्तिमित ! डोळ्यांना भासमान केवळ
असंख्य रक्षाकण–दिगंत प्रवासी,
चंदेरी स्वप्नांचे–मोतिया शालीचे !

प्रसिद्धी ‘ गृहिणी-विद्या ’

□ □

## ७ : भग्नस्वप्न

मंदावल्या तुझ्या नेत्रीं
किनारत रम्य स्वप्न.
ओसरत्या अश्रुसरी.
ठिबकती गालावरी १.

आसुसल्या तुझ्या ओष्टीं
भग्न आशांच्या चिता.
अन्तरीचे रत्नदीप
काजळल्या ज्योतिप्रभा २.

भावलाटा अन्तरांत
सान्तसीमा ओसरती.
प्रेमलता निश्वासत
भूमीवरी पडे कोळ. ३.

हृदयाची भग्न वीणा
निनादत अश्रुगीत,
प्रणयाच्या स्मशानांत
विलीन हो अनंतात ! ४.

प्रसिद्धी ' अभिरुची '

□ □

## ८ : आस

अन्तरीची विशाल स्वप्नें,
जीवनांत कधि जगेन कां रे
जगेन कां ? १.

सांग माझ्या मानसीच्या,
भावकळ्या फुलतील कां रे
फुलतील कां ? २.

प्रवाह आटला जीवनाचा.
सुकून गेल्या भोळ्या आशा.
मानसीची ही प्रीतीलता,
कधि सख्या पालवेल कां रे
पालवेल कां ? ३.

विरून गेलें स्वप्न प्रीतीचें.
धुकें दाटलें नैराश्याचें.
प्रीत अपुली–अमर ज्योति,
अनंतांत त्या जुळतील कां रे
जुळतील कां ? ४.

प्रसिद्धी, ' अभिरुचि '

□ □

## ९ : कोणासाठीं ?

कोणासाठीं प्रकाशती,
अन्तरीचे नंदादीप
मंद प्रभा पसरती ! १.

कोणासाठीं उमलती,
मानसीच्या सान कळ्या
प्रीतगंध दरवळे ! २.

कोणासाठीं नाचताती,
नेत्रांतल्या या चांदण्या
हुरहूर हृदयाला ! ३.

कोणासाठीं फुलताती,
भावनांच्या चंद्रज्योति
मानसाच्या अन्तराळीं ! ४.

कोणासाठीं कोमेजति,
ओठांवरी जासवंदी
रात्रंदिन झुरताती ! ५.

कोणासाठीं उसासती,
उरांतली हीं पांखरे
मूकश्वास उमटली ! ६.

कोणासाठीं काजळती,
अन्तरीच्या क्षीण ज्योति
रक्षाकण उधळती ! ७.

प्रसिद्धी, 'यशवंत'

□ □

## १० : तृप्ती

अशीच एक रात्र येते अन्
सोनेरी स्वप्नें आपली पांखर पसरतात.
निर्वाणाची नीरव शान्तता वस्तुजातावर स्थिरावते
पिठोरी चांदणें अमृतसडा धरणीवर शिंपतें. १.

मला याची खंत नसते, कारण
प्रीतीचें रम्य स्वप्न उमलत असते.
संगमासाठीं तूं अमृताचा वर्षाव करतेस.
तृप्तीची मंदधुंद लाट अंगांगावर पसरते. २.

अशीच एक रात्र येते, अन्
सुकतीचे करुण सूर दूर दूर पसरत जातात.
पानाआडच्या अधीर चातकाची आर्त हांक उमटते.
अन्तरीच्या अन्तरीं भावलाटा उसळून येतात. ३.

मला याची खंत नसते, कारण,
मीलनासाठीं तूं माझ्याकडे धांव घेतेस.
विशाल बाहुपाशांत विश्रब्धपणें लोटून देतेस.
सर्वस्वाचं दान माझ्या ओंजळींत टाकतेस.

अशीच एक रात्र येते, मला त्याची खंत नसते.

□

## ११ : आवाहन

पुरे झालेत आतां हे आढेवेढे.
'नको'चा खेळ खेळलीस. जगाच्या भीतीनें.
स्वतःच्या भावना मारून, मला थोपवून.
मीलन हें कां पाप आहे ?
मनानें सारेच व्यभिचारी. ओंगळ, पापी.
कबुली देऊन पुन्हा पापाला मिठी मारणारे.
बघ ते संसारी प्रतिष्ठित
पावित्र्य विडंबनांत डुंबणारे, महाभाग !
अन्तर्यामी उठणाऱ्या भावनांना साद दे.
भीतीच्या पोटीं—
पावित्र्याच्या, नीतीच्या खुळ्या कल्पनांना कवटाळूं नकोस.
प्रीतीची ज्योत आतांहि विझवशील तर—
वैफल्याचे रक्षाकण वेंचावे लागतील.
श्रेयस-प्रेयसाच्या झुंजींत रक्तबंबाळ होशील.
अन् शेवटीं हातीं येईल तुझ्या अन् माझ्या,
एक अर्थशून्य पोकळी ! रिकामी नरोटी !

□□

## १२ : परिपूर्ती

बऱ्याच दिवसांत भेटली नव्हतीस.
जमीन तडकली होती रणरणीत उन्हांत.
उसासत होती, आतल्या आंत गुदमरून.
कळवळून निश्वासत होती, जलधारांच्या स्पर्शासाठी.
जलदांनीं तिची व्यथा जाणली.
ती हुंकारली. फुलली. विसावली.
तिच्या देहावर नवीन तेज तरारलं.
समाधानाचं. परिपूर्ततेचं. सार्थकतेचं !
तिच्या देहावर नवीन अंकुर खेळूं लागले,
तिच्या हाडामांसाचे. जीवाभावाचे. सर्वस्वी तिचे.
माझं मन विरहानं दुभंगलं,
तोंच–
तूं आलीस. फुललेली, अंकुरलेली, सतेज, समाधानी.
धरणीसारखी !

□□

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १५४८६
संदर्भ शाखा

## १३ : जखम

आज दुपारीं घर आवरत होतो, दोघे आपण,
पुसतांना टिपॉयच्या काचेला तडा गेला.
माझ्या बोटांतून भळभळा रक्त वाहूं लागलं.
धांवलास तूं माझ्या मदतीला.
अन् माझं मन गतकाळांत सरलं.
माझ्या कौमार्याला तडा गेला होता, अजाणतां.
रक्तबंबाळ, कलंकित झाले होते मी.
आज वाटतं, तूं असतास तर–
धांवला असतास कां असाच ?
शब्द ओठांवर आले. पण बांध घातला मी त्यांना
स्वतःला सावरलं.
अन्तरांत एक तीव्र सणक उठली.
पण मी सहन केलं सारं,
तुझ्या भीतीनं.
वरपांगी हसून. कृतज्ञता दर्शवून !

□ □

## १४ : दिलासा

शिशीरांतली एक मध्यरात्र
अखिल वस्तुजात सृष्टीच्या कुशींत विश्रब्धपणे विसावले आहे.
बाहेर जोराचा हिमवर्षाव चालूं आहे.
पानें, फुलें गारठून, गोठून भयभीत झाली आहेत.
अन् जीवन मरणाच्या आवर्ताचे क्षण वेंचीत आहेत.
'टेम्स' अंग मुडपून आक्रसून पडली आहे.
चर्चच्या घड्याळाचे बारा टोले कानांवर पडत आहेत.
मंद, शान्त. संन्यस्ताच्या गंभीर पावलासारखे!
मी एकटीच. तूं सहा हजार मैलांवर दूर आहेस.
या जीवघेण्या थंडीची भीति वाटते रे मला!
वाटतं, तूं अशावेळीं जवळ असावास.
कसं कुणास ठाऊक, तुझा तो पहिला स्पर्श आठवतो.
सळसळणाऱ्या रक्ताचा. उष्ण. चैतन्य उसळविणारा. सुखद.
तुझ्या स्मृतिस्वप्नांत रात्र नकळत ओसरते.
मी सुटकेचा निश्वास टाकते. सृष्टीप्रमाणें
कारण–
पूर्वेचं क्षितीज रक्तवर्ण रेषांनी किनारलं जात आहे.
दिलासा देणारं! वस्तुजाताला अन् मला!

□ □

१५ : संगम

आठवते कां तुला ती सोनेरी सांज ?
SUNSET पॉईंटवर उभे होतो आपण.
क्षितीजावर गुलाबी, केशरी रंगाचा स्वैर खेळ बघत.
पुढें अथांग निलीमा पसरला होता. रत्नाकरासारखा !
सर्वत्र निःशब्द शांतता !
आपल्या मधुचंद्राची ती पहिलीच सांज.
मावळतीच्या अंगावरचे रंग क्षणाक्षणाला बदलत होते.
एकरूप झालों आपण त्यांच्याशीं
सहस्त्ररश्मि गुलाबी, केशरी खेळांत अन्तर्धान पावत होता.
सशाच्या पावलांनीं !
सायंतिनीच्या सांवल्या दूरवर पसरूं लागल्या.
अस्तंगतानंतर निशेनें आपलें पाऊल टाकले, भीत भीत.
तेव्हां तूं मला अधिकच बिलगलीस. विश्वस्तपणें.
मी तुला जवळ ओढलं. ओठांवर ओठ टेकले.
आपल्या प्रीतीचं स्वप्न उमललं.
संध्या अन् उषा एकरूप झाल्या,
उमललेली स्वप्नं अंगावर लेवून !

□ □

## १६ : तूं अशीच ये !

उगवतीचा रंग उधळीत तूं अशीच ये. स्वप्नांच्या पंखावर.
नीलाकाशाच्या अंगावर चांदण्यांचा नाच चालला आहे.
पौर्णिमेचा चांद विलसत आहे.
रोहिणीच्या आतुर पावलांनीं सुखावला आहे.
सर्वत्र शांतता पसरली आहे.
सागराच्या निळ्याभोर लाटा उंचावत आहेत.
रोहिणीशी स्पर्धा करीत !
पण—
स्वप्नभंग होतांच त्या किनाऱ्यावर अंग टाकून देत आहेत.
मी एकटाच बघत आहे हा शिवाशिवीचा खेळ.
तेव्हां कशी कोण जाणे तूं जवळ येतेस.
माझं स्वप्न उमललं. फुललं. आकारलं.
तुला जवळ करतांच तूं विसावलीस.
ओठांवर ओठ ठेवतांच म्हणालीस,
‘ नको. जागी होईल ना ती.’
मी या रम्य स्वप्नांतून जागा झालों. दचकून.
पाहिलं तों ती शांतपणें झोंपली होती.
तुझा अंदाज, तुझी भीति अस्थानीं ठरली.
म्हणून म्हणतों,

उगवतीचा रंग उधळीत अशीच ये. माझ्या स्वप्नांच्या पंखावर!

□ □

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना.
अनुक्रम ८३९९४ वि. काव्य
क्रमांक १९८४ नोंद दि. ६।३।८१

## १७ : स्मृति-तरंग

मृग नक्षत्र संपलं. कोरडं.
आकाश ढगाळून आलं तरी एकही सर कोसळत नाहीं.
मळभानं त्याला व्यापून टाकलं.
मनस्वी उकाडा. न साहवणारा.
शरीर शिजून निघत आहे.
स्वेदधारा वहात आहेत. अंगातून
झाडाचं पानही हलत नाहीं. वारा पडला आहे.
निद्रिस्त शरीरासारखा !
सुकतीचे भेसूर सूर आसमंतात पसरत आहेत.
शरीर आतून पेटलं आहे. जीव कासावीस होत आहे.
पण–
एक मंद मंद लहर अगांगावरून पसरत जाते,
पहिल्या संगमाची.
तो सुखद स्पर्श, चंदेरी चांदण्यांतला.
समुद्र किनाऱ्यावरच्या त्या मंद लहरी,
लाटांचं स्वैर नर्तन,
तुझ्या नेत्रांतल्या चांदण्यांचं तें संगीत,
गालावरील रक्तिमा. प्रणयाचे ठसे
बाहूपाशांत विसरल्यावर पडलेली अवतींभोवतीची विस्मृती.
या रम्य स्मृतीनें जीवघेण्या या रात्रीचा विसर पडतो,
डोळ्याला डोळा लागतो. स्वप्नांच्या पंखावर तरंगत !

□ □

आठवतंय?
'वर्षा' सहलीला आपण गेलो होतो. दोघेच.
नागफणीच्या टोंकावर उभे होतो.
उगवतीची वेळ. धुंद कुंद.
धुक्याचा प्रचंड लोळ दूरवर पसरला होता.
अथांग सागरासारखा!
गिरीशिखरावर पांढुरकं नीलसर धुकं अंगासलं होतं.
मधूनच वायुलहरी वहात होत्या,
रम्य स्वप्नासारख्या.
क्षणाक्षणाला धुकं लोटलं जात होतं, पुढें पुढें.
खाली नागदरी पसरली होती.
धुक्याची एकादी प्रचंड लाट आपल्या अंगावर येई.
अन्–
आपण दूरावले जात असूं. भांबावून.
मी अस्वस्थ झालों व तुला म्हटलं,
'सरकूं नकोस. तशीच रहा.'
तुला आधार द्यायला मी हात पुढें केला.
तो तूं घट्ट पकडून ठेवलास.
असेच कांहीं क्षण गेले.
तेवढ्यांत तूं किंचाळलीस. कारण,
एक नागीण समोरून सळसळत गेली.
भेदरून तूं मला अधिकच बिलगलीस.
सहल संपली.
दुसऱ्या एका नागिणीनं डंख धरला.
तूं दुरावलीस. कायमची.
आज एकटाच उभा आहे नागफणीवर,
तुझी स्मृति जपत, डोळ्यांत धुकें सामावून! □□

## १९ : फसलेला डाव

‘वर्षाच्या’ पहिल्या भोंवऱ्याच्या आवर्तांत
एक काडी पाहून,
तुझी आठवण येते. मला, १.

शिशीराच्या तुफानी वादळांत
भरकटते एक पान पाहून,
माझी आठवण येते. तुला. २.

हरित तृणाच्या मखमालीवर
सळसळती नागीण पाहून,
तिची आठवण येते. तुला. मला. ३.

नागिणीच्या डंखाचें जहर भिनलं आहे,
मृत्यूच्या भोवऱ्यांत आपण लोटले जात आहोत
पण डाव तिचा फसला आहे. मीलनानें आपल्या ४.

□ □

कळीच्या हृदयात,
शिरला भुंगा.
मध शोषून
उडून गेला १.

माझ्या हृदयांत,
शिरला राया.
रस शोषून
दूर सरला. २.

कळीचा उसासा,
विसरला भुंगा.
माझा उसासा
विसरला राया. ३.

□ □

## २१ : मनीषा

कोरलेला आलेख,
पुसूं नकोस
स्वतःच ! १.

प्रीतीचें फूल,
कुस्करूं नकोस
स्वतःच ! २.

दिलेलं वचन,
भंगू नकोस
स्वतःच ! ३.

उमललं स्वप्न,
चिरडूं नकोस
स्वतःच ! ४.

पापाचा धनि,
होऊं नकोस
स्वतःच ! ५.

□□

## २२ : अबला

चातक पक्षी,
म्हणतो मला
एवढे पान
दूर सार.
कसें करूं
पान दूर ! १.

निळा पक्षी,
म्हणतो मला
येतेस संगे
उंच उंच
कशी येऊं
उंच उंच ! २.

बुजरा ससा,
लपतो रानीं
म्हणतो मला
लपतेस कां ?
वृक्षाच्या आड
लपते मी.

चातक पक्ष्या,
पान नसेल
निळ्या पक्ष्या,
पंख येतील
पुढल्या जन्मीं ! ३.

□ □

## २३ : विरलेलें स्वप्न

तुला भेटायला नर्सिंग–होममध्यें आले मी.
दचकले मी. केवढा बदल झाला होता तुझ्यांत !
जीवनाचे अंतिम क्षण वेचीत होतास तूं,
पैलतीराची स्वप्नं चितारीत, ऐलतीराची सारी विसरून.
मी म्हटलं ‘ मी आले आहे ’
कानोसा घेतलास. माझ्या शब्दांचा ओळखलंस मला.
तुझ्या डोळ्यांत समाधानाची रेषा चमकली.
तुला प्रिय असलेला मोगरीचा गुच्छ पुढें केला.
पुन्हा तशीच रेषा चमकली. तृप्तीची.
अनंत क्षणांची साथ मागणाऱ्या विकल नेत्रांनी पाहिलंस.
अन् डोळे मिटलेस. पुन्हा कधीच न उघडण्यासाठी.
क्षणकाल फुललेला मोगरा सुकून गेला.
त्याचा सुगंध ओसरला.
मी परतले. शून्य मनानें.
तुझ्याकडे अन् सुकलेल्या मोगऱ्याकडे दृष्टि टाकीत,
पाणावलेल्या नेत्रांनी !

□ □

## २४ : प्रतीक्षा–तृप्ती

तळ्याच्या पाण्यांत
एक सावली
वाट पहात
दुसरीची १
हिरव्या पानांत
एक पक्षीण
वाट पहात
पक्ष्याची २.
तळ्याच्या पाण्यांत
सावली थकली
वाट पाहून
उसासली ३.
हिरव्या पानांत
थकली पक्षीण
वाट पाहून
उसासली ४.
तळ्याच्या पाण्यांत
सावल्या दोन
कुजबुज करीत
बिलगती ५.
हिरव्या पानांत
दोन पक्षी
कुजबुज करीत
बिलगती ६.
तळ्याच्या पाण्यांत
सावली एक
वाट पहात
विरलेली ७.
हिरव्या पानांत
एक पक्षीण
वाट पहात
विरलेली. ८.

[प्रसिद्धी, 'अर्चना']

## २५ : मीलन

रातराणीची एक मंद धुंद लहर आंत डोकावते,
मदनबाणाच्या सुगंधाचा मागोवा घेत,
चंद्र सागराच्या पाण्यांत डोंकावून बघतो,
रोहिणी पृथ्वीतलावर उतरली म्हणून.
तेव्हां—
तूं आत येतेस, अधीरतेनें. उसासत.
माझा शोध घेत.
रातराणीची मंदधुंद लहर एकरूप होते,
मदनबाणाच्या सुगंधाशी. चंद्र रोहिणीशी.
आपणास विस्मृति पडते त्या दोघांची.
कारण आपणही एकरूप झालेले असतो
मीलनांत आपल्या.
त्यांच्या शुभेच्छांचा गंध अंगावर लेऊन.
ते दूर सरल्यावरही !

□ □

## २६ : आसवांची माळ

एकटीच होते मण्यांची माळ गुंफीत.
तुझ्या विरहानें पोळलेली.
एकेक मणी पुढें सरकत होता.
तुझ्या स्मृतींचा तसाच.
मीही माझ्या स्वप्नांचा, प्रीतीचा एकेक मणी
शोधत होते अधान्तरीं.
माळ पुरी झाली, मी गळ्यांत घातली.
पण तुझ्या स्मृतीची माळ अपुरीच राहिली.
मनांत घुमसणारी सल बाहेर पडली.
डोळ्यांत, अश्रूंच्या रूपानं.
त्या मोत्यांच्या माळेंत शोधूं लागले,
तुझ्या प्रीतीचे रेंगाळणारे, घरंगळणारे मणी.
शोधणार आहे रे मी कल्पान्तापर्यंत
अशीच !

□□

## २७ : स्वप्नरेषा

पूर्णिमेच्या धवल चांदण्यांत, नीरव शान्ततेंत,
पहाटेला जागा मी. एकटाच.
प्राजक्ताच्या धुंदकुंद लहरी अंगावर घेत.
दूरवर येणारे जोगियाचे तुझे स्वर अन्तरीं सांठवीत.
तुझ्या मधुर सूरांची निशा उसासते. माझ्यासारखीच.
उषेचं स्वप्न अन्तरांत चितारीत.
माझ्या मनांत तुझ्या स्मृतीची पांखरें चिवचिव करतात.
पूर्वेचं क्षितीज रक्तवर्ण रेषांनी चितारलं जातं,
तुझ्या मीलनाच्या आशेनं. निशेच्या स्वप्नासारखं!

□□

अनंत निलीम्याला छेदणाऱ्या निळया पक्ष्याची निळी स्वप्नं,
कोरून ठेवली आहेत सरितेनं, आपल्या मनांत.
जशी मी तुझी कोरली आहेत.
पारध्याच्या शरसंधानाला बळी पडतांना उमटलेले त्याचे
आर्त स्वर,
टिपले आहेत सरितेनें, अगतिकपणें. डोळ्यांत अश्रू आणून,
जसे टिपले आहेत मी तुझे.
त्या स्वप्नील निळ्या पक्ष्याची प्रतीक्षा,
अजून करते सरिता.
जशी मी करते तुझी ! अनंत क्षण !

□ □

## २९ : वंचना

ग्रीष्मांत रखरखल्या वाळवंटांत एक हरिणी.
एकाकी. थकलेली. भागलेली. तहानेनें व्याकूळ.
समोर प्रखर तेजाच्या लाटा बघून,
पाण्याच्या आशेनं धांवली.
पण साराच आभास !
मी धांवले रे तुझ्यामागे, उसासत.
तूं माझी तृष्णा शमवशील म्हणून.
पण तोही आभास !
कारण—
तुझ्या धगधगत्या वचनांना प्रीतीच्या लाटा समजले.
वंचित झाले रे. हरिणीसारखी !

□ □

## ३० : उपेक्षा

तोडायचंच होतं तर गुंफिलेस कशाला रेशमी धागे ?
कां खेळलीस खेळ अक्षांश–रेखांशाचा ?
गळ्याची शपथ घेऊन म्हणालीस, 'तुझीच मी'
कां तोडलंस नातं मग ?
वैफल्याच्या जहरानें झालेला माझा नीलकंठ बघायला ?
आयुष्याचं सम गणित व्यस्त रूपानें सोडवलंस.
वाटलं होतं तुझी करारी वृत्ति कोसळणार नाहीं.
पण तूं ढळलीस स्वार्थानं.
पण लक्षांत असूं दे–
वळण बदललं तरी प्रवाहाचा जोर ओसरत नसतो.
तोच प्रवाह तुझ्या पायाखालून वहात जाईल.
अन् भोवऱ्यांत खेचेन तुला.
जेव्हां धांवा करशील माझाच. स्वतःला वांचविण्यासाठीं
पण तोहि स्वार्थच ठरेल तुझा !

□ □

## ३१ : शहारा

ग्रीष्माचा प्रखर दाह. पंख झटकले तिनं.
इवलीशी, कोमल पिसं खालीं पाण्यावर तरंगली.
तिनं झेंप घेतली. थंडाव्यासाठी.
पाण्यांत ती विसावली. उल्हसित वाटलं तिला.
पुन्हा पंख झटकले तिनं.
त्यांतून उठणारे तुषार त्या पिसांवर अंगासले,
ती आनंदली, त्या मोत्यांची दीप्ति बघून.
दुसऱ्याच क्षणीं—
ती शहारली. गहिंवरली. विषण्ण झाली.
कारण—
तिची मोत्यांची पिसं गडप होत होती पाण्यांत !

□ □

## ३२ : चक्र

नियतीचं चक्र अचानक एका बिंदूवर स्थिरावलें.
अन्,
नीलमंडलांत लक्ष लक्ष चांदण्या नाचूं लागल्या.
प्रशान्त सागरानें अन्तरीच्या अन्तरीं कोरून ठेवलं त्यांना.
चंद्रानें रोहिणीसमवेत हर्षानें दरबारांत पाऊल टाकलं.
भूमितलावरील सुगंधांनीं स्वागत केलं त्यांचं.
माझं मन फुललं. तुझ्या स्मृतींनीं.
पण दुसऱ्याच क्षणीं—
नियतीचं चक्र पुढच्या बिंदूवर सरकलं, अन्
माझ्या अन्तरीच्या पाखरांचे दोन उसासे आसमंतात विरले!!

□□

## ३३ : झेप

सळसळणाऱ्या पाऊलवाटेवर एकटाच चालला होतास
धूसर चांदण्याच्या उसळणाऱ्या प्रचंड लोळांत,
सपसप पावले टाकीत. सापासारखा !
तुला वाटलं, आपण शिखर गाठूं एका दमांत.
आवरलं तुला मी. पण तूं निसटलास.
भेदरले रे मी तुझी झेप बघून !
अन् दुसऱ्याच क्षणीं—
तुझ्या आर्त किंकाळीनें आसमंत भरून गेलं.
दरीच्या टोंकापर्यन्त धांवले मी.
नियतीच्या विकट हास्यानें दरी दुमदुमत होती.
धूसर चांदणं माझ्या डोळ्यांत भरलं होतं.
अनागताला लपवून !

□ □

पानांच्या जाळ्यांतून निसटलेल्या चंद्रकिरणांचे टपोरे कवडसे,
धरणीनें झेलले आपल्या अंगावर अन् ती सुखावली.
बुट्टयाचा शालू नेसलेल्या स्त्रीसारखी !
स्मृतींच्या जाळ्यांतून निसटलेला एकच कवडसा,
टिपला माझ्या मनानं, मधुचंद्राच्या रात्रीचा. अन्
माझं अंग शहारलं.
धरणीपेक्षां मी भाग्यवान समजले स्वतःला !

□ □

## ३५ : दैवाचा दुर्विलास

प्रचंड वादळ. मुसळधार पाऊस. बाहेर.
खिडकी बंद करून, आंत बसले मी एकटी.
झोंबरं वारं आंत शिरत होतं. वाघाच्या झडपेसारखं !
मी भेदरले.
खिडकीचं तावदान निखळलं.
जोराचा पाऊस अन् वारा आंत शिरला.
वाटलं, कुणीतरी जीवाभावाचं जवळ असावं. रक्षणासाठीं.
तोंच दारावरची घंटा वाजली.
माझ्या जिवांत जीव आला.
वाटलं, तूं परतला असशील. दार उघडले.
भेदरून तशीच उभी राहिले. निर्जिव पुतळ्यासारखी !
कारण दहा वर्षांनीं तो चांडाळ उभा होता. समोर.
माझ्या कौमार्याचा भंग करणारा सैतान !
पुन्हा सूड घेण्यासाठीं !
वादळ अन् पाऊस त्याला सांथ देत होते.

□□

असं होतं कधीं–
    नीलाकाशाच्या गळ्यांत इंद्रधनूचं अर्धवर्तुळ चमकतं
    अन् आकाशाचं मन फुलतं. कारण,
    मंगलसूचक असतं त्याला तें.
अन् त्याच वेळीं
    सूर्याभोवती एक खळं आकारून येतं.
    अस्वस्थ होतं मन, कारण अशुभ असतं ते.
मग माझ्या मनांत येतं,
    तुझ्या गळ्यांतलं मंगलसूत्र आनंदित करतं तुला,
    मंगल असतं तुला तें म्हणून.
    तें दुष्ट खळं अस्वस्थ करतं मला. कारण—
    अशुभ असतं तें मला !

□ □

## ३७ : अगतिक

पौर्णिमेच्या रात्रीं दोनचा सुमार.
जागीच होते मी. तुझी आठवण काढीत.
आकाशांत चंद्र अन् रोहिणी विलसत होते.
तेवढ्यांत, एका कृष्णमेघानें झांकळून टाकले त्यांना.
अस्वस्थ झाले मी. त्यावरून दृष्टि वळविली.
झाडांवर एक पक्षी पक्षिणीला चोचीनें चेतवीत होता.
वाऱ्याच्या एका झुळकीनें त्यांना पानाआड झांकळून टाकले.
मला ऐकूं आली फक्त त्यांची फडफड. घुमारे.
माझी दृष्टि वर गेली. मेघ दूर सरला होता.
चंद्र अन् रोहिणी पूर्ववत विलसत होते.
माझ्या अंन्तरीं तुझ्या विरहानें एक तीव्र सणक उफाळली.
अन् दोन अगतिक अश्रू गालांवर ओघळले.

□ □

## ३८ : इशारा

तुझ्या नेत्रांत चमकली इशाऱ्याची चांदणी.
जणुं कांहीं—
कोमेजत चाललेल्या गुलाबाची उरलेली पाकळी,
शान्त जलाशयावरील एक तरंग,
झरोक्यांतून विसरलेला एक कवडसा.
अन् त्यांत भासली,
बंदिस्त पांखराच्या पंखांची फडफड,
दबलेल्या गतकाळांतील एक स्वैर सूर,
उज्ज्वल अनागताचं सुचिन्ह,
सुखाचं अफाट विश्व माझ्यापुढें मांडणारं !

□□

३९ : खळं

स्वाती नक्षत्रांत जलदांचे अश्रू शिंपल्यांनीं हृदयांत टिपले.
ते मोती रत्नाकरानें आपल्या अतर्री लपविले.
तूंही रत्नाकरासारखाच, स्वार्थी !
माझ्या प्रीतीचे मोती दडवून ठेवणारा ! १.

चातक पक्ष्याच्या प्रीतिसंगमाच्या आड येतं एक पान, जीवघेणं.
तुझ्या माझ्यांत तूंच उभारलंस, तुझ्या प्रतिष्ठेचं.
मला वंचित करण्यास. २.

इंद्रधनूच्या सप्तरंगांत न्हाऊन निघाले रे मी !
पण तूंच फेकलंस दुष्ट खळं भोवतीं माझ्या.
माझं अशुभ सुचविणारं. ३.

चंद्राला बघून प्रीतीचा इंद्रनील मणी स्त्रवूं लागला.
पण तूं तसाच राहिलास, कलंकित.
माझ्या वितळण्याची उपेक्षा करून ! ४.

□ □

## ४० : प्रतिमा

आठवतात कां तुला आपल्या दोन प्रतिमा ?
ओठांची जुगलबंदी,
डोळ्यांचे मूक संगीत. अन्
अनेक श्वासांचे मीलन ? १.

आज पहात आहे माझीच प्रतिमा एकटी.
माझ्या ओठावरील भग्न आशांच्या चिता,
डोळ्यातले सुकतीचे करुण सूर.
ऐकते आहे माझाच
एक प्रदीर्घ निश्वास. आसमंतांत रेंगाळणारा. अगतिक.
माझीच प्रतिमा धुकाळून टाकून,
मला भिंगारणारा ! २.

□ □

## ४१ : असं कां झालं ?

सांग, असं कां झालं ?
असंख्य योजने तुडविलीस संगतींत माझ्या,
हरिण दौडीनं. हंसत खेळत. हर्षभरानं.
पण अडकलीस क्षणाक्षणाला सप्तपदीच्या चिमुकल्या प्रवासांत.
मिरविलेस मनानं माझ्या हातांचें मंगलसूत्र.
पण अचेतन सुवर्ण मंगलसूत्रानं अवघडलीस.
हरवलीस माझ्या डोळ्यांतल्या मूक संगीतानं.
पण विवाहाच्या मंत्रांनीं बधीर झालीस क्षणांत
आपल्या वचनांच्या प्रवाहानं भारून टाकलंस मला.
पण ओसरले, सुकले ते प्रवाह.
तुझ्या शब्द पाखरांना बंदिस्त करून.
सांग, कां झालं असं ?

□ □

४२ : आरे

उगवती पाऊलते स्वप्नांतल्या संगमांतून मला दूर ओढून
उभा दिवस एकलेपणांत मला लोटण्यास.
दिवास्वप्नाच्या सुखालाही पारखी होते मी जीवनकलहांत,
रेंगाळणारी मावळती तुझ्या स्मृतीच्या सांवल्या पसरीत येते,
मोत्यांचं दान करून.
मावळतीच मग उसासते. मला एकटीला पाहून किनाऱ्यावर,
अवतीच्या कृष्ण छाया बघून.
स्वतःला हरवून बसलेली मी भानावर येते,
अन् मग निशाच सोबत करते मला
उघड्या डोळ्यांनीं, ओल्या पापण्यांनीं, उसासत.
तुझ्या रम्य स्मृतींच्या स्वप्नांची अमोल भेट देऊन,
उषेला बजावीत. पण–
सूर्याचे किरण माझ्या आर्त क्षितीजावर पसरून,
अन् कालचक्राच्या आऱ्यावर स्थिरावून, मला डिंवचतात !

□ □

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
123558 काव्य
9548 8.3.1991
मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. 96584

## ४३ : धसका

अशीच एक दुपार येते
संन्यस्ताच्या शांत, धीरगंभीर पावलांनी.
काळ्या ढगांना डोळ्यांत सांठवून. गदगदत. अन्
वृक्षलतांवर अबोलीची शाल पसरून.
तेव्हां मी विषण्ण पावलांवर उभी असते. एकाकी.
तुझ्या स्मृतींचे मेघ डोळ्यांत सांठवून. उसासत.
अबोल. व्यथित. अश्रूंच्या हिंदोळ्यावर हेलावत. शहारत.
अन्
अनागतांतील अशा अनेक दुपारींचा मनांत धसका घेत !

□ □

जलाशयांत उतरले तुझ्यासंगें.
विश्वासानं. तूं पैलतीरापर्यंत साथ करशील या आशेनं.
तूं सावरीत होतास क्षणाक्षणाला.
पण—
नियती पायाखालची वाळू वाहून नेत होती.
मी भेदरले, तुझा आधार सुटला तशी. अन्
प्रचंड भोवऱ्यांत सांपडले.
भिंगारून टाकलं मला त्यानं.
शेवटची आशा तुझ्या मदतीची करीत होते.
पण एका प्रचंड लाटेनें तुला दूर नेलं.
तूं दिसलास, भरकटलेल्या जीर्ण पत्रासारखा,
अगतिक ! प्रवाहांतच आसवांची माळ अर्पित !

□ □

## ४५ : तुटलेले दुवे

उसवलेले धागे गुंफायचं म्हटलं तरी येत नाहीत गुंफिता.
उभे धागे आडव्या धाग्यांपासून दूर सरतात.
जीवनाची सारी वीण विस्कटून जाते अन्
धागे सैरभैर उडूं लागतात. पिसांप्रमाणें इतस्ततः
तूं गेलास घेऊन उभे धागे,
आडवे माझ्या हातीं ठेवून. एकाकी मी आता जन्मभर असणार.
तुझ्या स्मृतींची पिसं सैरभैर उडवीत,
तुटलेले दुवे व्यर्थ सांधीत,
तुझ्या प्रतीक्षेच्या पंखावर बसून !

◻◻

## ४६ : शोध

तुझा शोध घेते तेव्हां स्वतःला हरवून बसते.
स्वत ला शोधूं लागते, तेव्हां तूंच गवसतोस अन्तरांत !
शिवाशिवीचा हा खेळ चालूच असतो. क्षणाक्षणाला.
तूंच पारध करतोस, मला रक्तबंबाळ करून,
तुझ्या शरसंधानानें.
मीच सावज होते रे तुझ्या पुरुषी अहंकाराची,
तुझ्या संगतींत अन् तुझ्या विरहांत !

□ □

## ४७ : कूटजाल

पौर्णिमेच्या चांदण्यांत रुपेरी जलाशयांत उडी घेतली मी,
निळावतीच्या कूटजालाची तमा न बाळगता.
कारण—
मला तुझ्या अन्तरीचे मोती शोधायचे होते,
तुझ्या नेत्रांतल्या डोहांत बुडी मारून. पण
दडलेल्या मगरींनी मला वेढून टाकलं.
माझी आर्त हांक ऐकूनही शान्त राहिलास तूं,
रुपेरी पृष्ठभागाला कवटाळीत,
तुझं कूटजाल माझ्यापासून लपवून !

□□

## ४८ : एकच उत्तर, पण किती उशीरा !

अनेक हांका माझ्या. तुझं एकच उत्तर.
किती उशीरा आलं पण !
जीवनाचे सारे रंग बदलून गेले.
प्रवाहानं निराळं वळण घेतलं.
आवरतां आलं असतं त्याला.
पण तूं अडकलास विचारांच्या जाळ्यांत.
कापूस पिंजित बसलास, विचारांचा.
अन् उडून गेले सारे तसूं अवकाशांत.
तुला भुलवून !
खूप वाट पाहिली मी तुझ्या उत्तराची.
वाटलं होतं, जाणशील तूं माझ्या भावना.
तुझ्यासाठी, सहन केला अन्तरीचा कोलाहल,
केवळ तुझ्यासाठी. तुझ्या होकारासाठी.
पण तुझं पिंजणं चालूंच होतं.
क्षणाक्षणाला उत्कंठ होते मी.
शेवटी, वाट पाहून थकले. निराश झाले.
अगतिकपणें पुढें सरले. अनिच्छेनें,
तुलाच अन्तर्यामीं स्मरत. प्रार्थित.
शेवटीं आज बांध फुटला तुझा. हुंकाराचा !
एकच उत्तर. पण किती उशीरा !

□ □

## ४९ : जित्याची खोड

अनेक वळणावर वक्रगतीनें वाटचाल करीत,
भेटलीस मला माझ्या वाटेवर.
मी तुझा स्वीकार केला. तुझा गतकाळ विसरून.
वाटलं होतं, तूं साथ करशील जन्मभर.
वचन दिलंस, डोळ्यांत अश्रू आणून. कृतज्ञ भावनेने.
मोठ्या मनानं मी तुझ्या हातांत हात दिला.
त्यानन्तर जीवनाच्या वाटेवर काही पावलंच चाललों आपण.
पण चोरवाटेचा तुझा तलास चालूच होता,
वरपांगी एकनिष्ठता दर्शवून !
पुन्हा गळ्याची शपथ घेऊन म्हणालीस ' तुझीच मी '
मी मोहरलो. पण—
क्षणकालाचं सुख ठरलं तें. कारण—
पहिल्याच वळणावर तुझी पावलं गेली.
आज उजळ माथ्यानें त्या वळणावर जात आहेस,
अनागतांतील अशाच वळणाच्या तलासांत !

□ □

धुमसणाऱ्या, गदगदलेल्या आकाशांत,
गुदमरणाऱ्या मेघांना एका शीतल शब्दानें स्पर्श केलास.
कां ?
अन्तरीच्या कोलाहलांत दबलेल्या भावनांच्या कोसळणाऱ्या
धारा बघायला ?
तापलेल्या तव्यावर सांत्वनाचा एक जलबिंदु टाकलास.
माझ्या मनाची तडफड बघायला ?
कां आलास अचानक ?
माझ्या मनाची तटबंदी कोसळून उध्वस्त झालेली बघायला ?
जा. जा तूं परत. थांबू नकोस क्षणभरही.
करूं दे सहन मला सारं. एकटीला !
तुझ्या उपेक्षेचं जहर पचविलं मी या क्षणापर्यंत.
तूं अंगार फुलविलेस. पोळले रे मी पुरी !
आतां फुंकर घालतो आहेस मानभावीपणानं.
निराळी झाली आहेत आपली विश्वं. दूर. दूर. स्वतंत्र.
राहूं दे मला माझ्याच विश्वांत. धुमसणाऱ्या, गदगदलेल्या.
एकटी, पण खंबीर. अपराजित !

□□

## ५१ : भरारी

टेनिसनची ' Eagle ' शिकवीत होते मी मुलींना.
अनन्त आकाशाचा वेध घेणारा,
कड्यावरून आपल्या भक्ष्यावर झडप घालणारा गरुड
पक्षांचा राजा!
तुझंच प्रतीक वाटलं मला.
नीलमंडळाला छेदणाऱ्या तुझ्या भरारीनें दिपून गेले रे मी!
तूं झडप घातलीस. घायाळ झाले मी पुरी.
तरी अभिमान वाटला ध्येयवादी जीवनसाथीचा.
वाटलं होतं, तूं क्षणकाल संसारांत रमशील,
माझा अमृतकुंभ भरेल.
पण तसं तुझ्या स्वभावांतच नव्हतं.
अजून तुझी भरारी तशीच चालू आहे.
हें विश्व अपुरं पडतंय तुझ्या स्वप्नांना, तुझ्या झेपेला
कधि काळीं येतोस घरट्यांत अन्
घायाळ करून परत जातोस.
थकले रे मी. अपुरी पडले. पदबद्ध.
खरंच वाटलं होतं तूं माझ्यांत, आपल्या बछड्यांत रमशील,
तुझी उत्तुंग भरारी जरा आवरून.
तुझं मोठंपण! शाप ठरला रे माझा!
तेंच, तेंच आहे माझं दुःख. जीवघेणी व्यथा.

*　　　*　　　*

या भ्रान्तींतून मी क्षणभर बाहेर आले अन्
पाणावल्या डोळ्यांनी, उसासे टाकीत वर्गांतून बाहेर पडले.
चिमणे जीव उसासत होते. घरीं अन् दारीं!

□ □

## ५२ : तूं आज भेटलीस तेव्हां.

तूं आज भेटलीस तेव्हां,
माझ्या मनाचं पाखरूं शहारलं,
अन्तराळीं त्याच्या झेपवर,
सोनेरी स्वप्नांचा थवा सरकला १.

तूं आज भेटलीस तेव्हां,
नयनीं माझ्या नीलमेघ दाटला,
त्यांतून स्रवणाऱ्या शतबिंदूंनीं,
देहाचा कण अन् कण विसावला २.

तूं आज भेटलीस तेव्हां,
अंतरीची सतार झंकारली.
त्यातून सरणाऱ्या मधुर स्वरांनीं,
अन्तरीचा दाह शमला. ३.

तूं आज भेटलीस तेव्हां,
हृदयांत उषेचं स्वप्न तरारलं.
त्यांतून ओसरणाऱ्या तेजकणांनी
अन्तरीच्या कृष्णछाया उजळल्या ४.

□□

## ५३ : माझे अश्रु

तुला वाटतात तसे सोपे नाहींत माझे अश्रू.
खोटे मोती, नकली मुखवटे असतात पुरुषांचे.
लक्षांत ठेव—
अन्तरीच्या आहाळांतून उडाले आहेत हे अग्निकण.
जात वेगळी आहे रे त्यांची.
तुला कधीच न उमगणारी. पटणारी. साहवणारी.
कारण—
तूं सतत डोहाच्या कांठावरच बसला आहेस,
तरंग वर्तुळांची शोभा बघत. त्रयस्थासारखा. अनभिज्ञ !
अंतरीचा कोलाहल तुला छेदणार कसा ?
विश्वास नाहीं मुळी तुझा,
माझ्या जळजळीवर, तळमळीवर, निश्वासावर, उसाशावर.
माझे कढ, माझे अश्रु, तुझं खेळणं आहे केवळ.
पण तीच आतां आहे रे माझी दौलत. सम्राज्ञीची !

□□

## ५४ : मौन

तुझ्या माझ्या मौनांनं आपलं जीवन हरवलं आहे,
खोखोच्या खांबासारखे दोघे आपण ! एकमेकापासून दूर.
तूं तिकडे, मी इकडे. मध्ये जीवनाची वक्र गति,
पाठलाग करणारी. उरफाट्या तोंडाची.
आपल्या दिवाणखान्यांतील दोन पुतळ्यासारखे आपण,
समोरासमोर. पण स्तब्ध, अबोल भावनाशून्य.
पण–
डोहाच्या पाण्यावर तरंग उमटत नसले तरी
त्याच्या अन्तरीची खळबळ बोलकी असते.
दबलेले उद्रेक अचानक उफाळून येतात.
अन् त्यांच्या लाटांना कांठही अपुरे पडतात !

□ □

## ५५ : एकाकी

अजून आठवते मला ती सायंकाळ.
समुद्रकिनाऱ्यावर आपण दोघे बसलो होतो
क्षितिजावरील रंगांचा अन्
धांव घेणाऱ्या अवखळ लाटांचा नाच बघत.
तेव्हां तूं म्हणालीस ‘ खोपा करते मी ’.
‘ हं, मी करतो एक किल्ला ’ म्हणालो मी.
सायंतिनीच्या सांवल्या दूरवर पसरूं लागल्या.
सागरलाटा उंचावत, फेंसाळत होत्या.
खोपा अन् किल्ला करणं संपलं.
तेवढ्यांत एक प्रचंड लाट आली.
तुझा खोपा उध्वस्त झाला.
माझा अजून तसाच होता.
अस्वस्थ होऊन म्हणालीस, ‘ जाऊं या परत ’
परततांना मागें व्यथित मनानं पाहिलंस.
अन् एक अगतिक निश्वास उमटला.

दहा वर्षांपूर्वीची ती सायंकाळ.
नियतीची निष्ठूर लाट आली
उध्वस्त केलं तिनं माझं स्वप्न.
आज सुखानं संसार करते आहेस तूं.
पण मी अजून तसाच. एकाकी !
तुझी चिरंतन स्मृति अन्तरीं सांठवून.
तूं जिंकलीस. मी हरलों. तरी आहे मी
तुझ्या सुखांतच सुख मानणारा. एकटा. अभागी !

□ □

कशाला आलास तूं या नरकांत ?
माझ्या देहाला पेटविते मी दररोज
त्याचा विक्रय करून.
क्षणाक्षणाला पिचत आहे. खचत आहे.
आडदांडांच्या पाशवी वासनेला बळी पडून.
पोटाची टिचभर खळगी भरण्यासाठी. मन मारून. यंत्रासारखी !
बघ हा गल्ला. चार रुपये पन्नास पैसे. रात्रीची कमाई.
नऊ वासनांची बिदागी. पण हे सर्व माझे नाहींत.
अडीच रुपये त्या चांडाळाचे.
आज तरी बरी आहे कमाई. नाहींतर उपासमारच असते.
बघ हे चट्टे, हे व्रण, फोड, पापांचे ठसे. कायमचे.
वाटलं नव्हतं तूं बाहेर असशील. वासनेला थोपवून धरीत.
नको येऊंस जवळ. मृत्यूला कवटाळूं नकोस.
विसरलास वाटतं ती रात्र ?
तूंच या देहाचा पहिला धनि होतास त्या रात्रीं.
वाटलं होतं, तूं घरटं बांधशील. पिलं वाढतील.
तुझ्या नि माझ्या छायेंत.
पण त्या चांडाळानं बंदिस्त केलं या नरकांत.
अन् मी स्वतःचा मृत्यु स्वतःच्या डोळ्यांनी बघितला.
भ्रष्ट प्रवाह तसाच वहात आहे.
जगतो आहे केवळ हा ओंगळ देह.
मनानं केव्हाच मेली आहे रे मी !
जा. दूर जा. थांबू नकोस.
येथे येणारे मरतात. तुला जगायला हवं,
तुझ्या बछड्यांसाठी. अन्
हे घे दोन रुपये. त्यांच्या खाऊसाठी.
आजची सर्व कमाई ! अन् वचन दे जाण्यापूर्वीं.
पुन्हा न येण्याचं. जा. थांबू नकोस ! □□

## ५७ : माती

पेटवून देऊं कां रे या मातीला ?
संसार असार आहे. माया. शुद्ध प्रतारणा !
जन्म मृत्यूंच्या आवर्तांतलं एक सत्य !
वैफल्याच्या कोषांत गुंतलेल्या जीवा, चुकतो आहेस.
जीवन सुंदर आहे. पवित्र आहे. सत्य आहे.
दिनरातीच्या अखंड गतींतून जाणाऱ्या पृथ्वीला विचार
ती सांगेल,
' अंगांगावर विसावणाऱ्या तृणांकुरांत माझं जीवन आहे.'
अन्तराळांत झेंप घेणाऱ्या शास्त्रज्ञाला,
चैतन्याचा शोध घेणाऱ्या तत्वज्ञानाला,
सृष्टीसौंदर्य आपल्या डोळ्यांत सांठवून ठेवणाऱ्या कलावंताला,
सूरांच्या स्वप्नांत हरवलेल्या गवयाला,
निर्जिव पाषाणांतून सजीव आकृती निर्माण करणाऱ्या कलावंताला,
साऱ्यांना विचारलंस तर ते सांगतील—
या मातीचा दुस्वास करूं नकोस. तिला पेटवूं नकोस.
' मृत्तिका एवं सत्यं ! '

□ □

किती तरी दिवसांनी तूं आलीस खोलीवर.
अचानक आलेल्या श्रावणसरींनी ओलिचिंब होऊन.
थंडीनें कुडकुडत.
किती रेखिव, किती सुंदर !
क्षणभर वाटलं, तसंच तुला जवळ ओढावं अन्—
पण मी मन आवरलं.
तूं आंत गेलीस. तिचे कपडे घालून परतलीस.
सौंदर्यप्रसाधनासाठीं उभी राहिलीस, आरशासमोर.
तेव्हां माझा संयम सुटला. जवळ घेतलं मी तुला.
तूं आढेवेढे घेतले नाहीस.
गृहलक्ष्मीच्या अधिकारानं वागलीस. निःशंकपणें.
प्रीतिसंगमातून आपण बाहेर आलो तों
तूं ओलीचिंबच. प्रेमाच्या वर्षावानें.
परतलीस शान्तपणें !
पावसाच्या सरींचा पुरावा अंगावर घेऊन.
अन्तर्यामीं सुखावून. श्रावणसरींचे आभार मानीत !

□ □

## ५९ : प्रश्नचिन्ह

तूं त्यांच्याशी सलगीने बोलत नाहीस.
मी तिच्याशी तसेंच.
कां ते तुला ठाऊक आहे.
मला माझं जसं.
पण आपण दोघंच असतांना,
किती मोकळ्या मनानं बोलतो आपण,
अखंड स्वैर प्रवाहाप्रमाणं.
आडपडदा न ठेवतां. हंसत. खेळत. खळाळत.
असं कां !
तुझ्याच मनाला विचार.
उत्तर सांपडलंच तर सांग.
तुझं उत्तर मला माहीत आहे.
माझं तुला जसं.
उत्तर असं, ' मलाही नाहीं. तुलाही नाहीं '
आपल्याला सांधणाऱ्या प्रीतीला विचारूं या.
पण ती तर मुलखाची अबोल.
एकूण सारंच कोडं ! न सुटणारं !
विवाहसंस्थेपुढचं प्रश्नचिन्ह ! तिला छेदणारं !

□□

उचललेलं पाऊल आतां घेऊं नकोस मागे,
थबकूं नकोस, अडखळूं नकोस,
बघ जरा समोर—
अखिल सृष्टीजात प्रीतीच्या मंगल तत्वानें भरलेलं आहे.
गिरीकंदरांत उगम पावलेले ओहोळ नद्यांना मिळत आहेत.
नद्या सागराला. आपल्या सर्वस्वाचं दान करून.
अन् अन्तराळीं—
अनंत अवकाशांत वायुलहरी एकमेकींत मिसळून जात आहेत.
सहस्त्ररश्मीचे किरण धरणीला आलिंगन देत आहेत.
अन् पौर्णिमेच्या रात्रीं—
नीलमंडळांत विलसणारा चंद्रमा सागरलाटांना कवटाळतो,
म्हणून म्हणतो—
उचललेलं पाऊल आतां मागे घेऊं नकोस.
सृष्टींत एकटं असं काहीच नसतं.
दोन जीव दैवी प्रेरणेनें एकमेकांत विलीन होतात,
उचललेलं पाऊल घेऊं नकोस मागे.

□ □

## ६१ : मी एकटाच म्हणून

शान्त सागरीं,
तुझीच प्रतिमा
येते आकारून
मी एकटाच असून. १.

नील नभान्तीं,
तुझीच छाया
सरते भांबावून,
मी एकटाच असून. २.

तुझ्या स्मृतीच्या,
वेड्या लहरी
येती मंदावून
मी एकटाच असून. ३.

तुझ्या अन्तरीं,
सान पांखरूं
येतें अंगासून
मी एकटाच म्हणून. ४.

तुझ्या प्रीतीची,
प्रेमळ माया
घेते सांभाळून
मी एकटाच म्हणून. ५.

□□

## ६२ : ठाऊक मला

ठाऊक मला
डोळ्यांतला ससा
भेदरलेला. १.

ठाऊक मला
गालावरी गुलाब
फुललेला. २.

ठाऊक मला
ओठांवरी पांखरूं
दचकलेलं. ३.

ठाऊक मला
वक्षांवरी पक्षी
घुमणारा. ४.

ठाऊक मला
पायांवरी हरीण
बुजणारं. ५.

ठाऊक मला
मनांतला चातक
आसुसलेला. ६.

ठाऊक मला
हातांतला गरुड
झेंपावणारा. ७.

ठाऊक मला
स्पर्शांतला मदन
भुलविणारा. ८.

ठाऊक मला
बाहूंतला लांडगा
हिंसणारा. ९.

□□

## ६३ : अनुभूति

माझं फूल
फुललं रे
तुझ्या स्मृतीनं. १.

माझं भान
हरपलं रे
तुझ्या नजरेनं. २.

माझा तोल
सुटला रे
तुझ्या स्पर्शानं. ३.

माझं मन
हरवलं रे
तुझ्या मिठीनं. ४.

माझी काया
शहारली रे
तुझ्या संगमानं. ५.

माझं स्वप्न
विरलं रे
तुझ्या वंचनेनं ! ६.

□□

तूं माझा आहेस अन् माझा नाहींस.
म्हणूनच मी अधिक सुखी आहे रे !
धर्मानं, कायद्यानं तूं माझा झाला असतास, तर
खचितच मी सुखी झाले नसते.
कारण—
विवाहितांचे संसार मी पाहते आहे रोज.
मंगलोरी कौले ! दोन पावसाळ्यानें विद्रूप दिसणारे.
संसारांतली नवी नवलाई संपली कीं साराच जोगिया !
प्रीतीगंध ओसरतो. उद्रेक संपतो. पूर ओसरतो.
उरते केवळ खडकाळ पात्र. शुष्क. रणरणतं.
तूं तसा माझा नाहींस म्हणून शहारते, तुझ्या स्पर्शानं.
अन् लोटून देते तुझ्या बाहुपाशांत.
विरहानन्तर रोधून धरलेला प्रवाह खळाळत वहातो.
तूं क्षणाचाच माझा आहेस म्हणूनच मी सुखी आहे रे !
याच सुखासाठी नंदादीप तेवत ठेवीन. कल्पान्तापर्यंत !

□ □

REFBK-0017546
REFBK-0017546

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
७३९९४ काव्य
१९७४ ६।३।७१

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
७८५८६